# पुण्यातील वैकुंठभाई मेहता संस्थेचे सहकार विद्यापीठात रूपांतर

## अर्थसंकल्पात ११ कोटी रुपयांची तरतूद

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** वैकुंठभाई मेहता राष्ट्रीय प्रबंधन सहकारी संस्थेचे रुपांतर सहकार विद्यापीठात केले जाणार असून, त्यासाठी या वर्षीच्या केंद्रीय अर्थसंकल्पात ११ कोटी रुपयांची तरतूद केली असल्याची माहिती राज्य सहकार परिषदेचे अध्यक्ष विद्याधर अनास्कर यांनी दिली.

डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे बृहन्महाराष्ट्र वाणिज्य महाविद्यालय (बीएमसीसी) आणि बीएमसीसी माजी विद्यार्थी संघटना यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'चर्चा अर्थसंकल्पावर' या चर्चासत्रात अनास्कर बोलत होते. अधिवक्ता गोविंद पटवर्धन, सनदी लेखापाल भरत फाटक, ग्राहक पेठेचे सूर्यकांत पाठक यांनी चर्चासत्रात सहभाग घेतला.

अनास्कर म्हणाले, 'सहकार क्षेत्रासाठी ९०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. पुण्यातील वैकुंठभाई मेहता राष्ट्रीय प्रबंधन सहकारी संस्थेचे रुपांतर सहकार विद्यापीठात केले जाणार आहे. त्याकरिता अर्थसंकल्पात ११ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. याशिवाय आयकर कमी करणे, अधिभार कमी करणे, सहकारासाठी विविध योजना, देशातील ७५ जिल्ह्यांमधून ७५ डिजिटल बँका, एक लाख पंधरा हजार टपाल कार्यालयांच्या माध्यमातून डिजिटल बँकिंग, सूक्ष्म लघु उद्योगांसाठी दोन लाख कोटी रुपयांचा निधी यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्था गतिमान होण्यास मदत होईल.'

पटवर्धन म्हणाले, 'वस्तू व सेवा कराची पूर्वलक्ष्यी अंमलबजावणी योग्य नाही. जीएसटी हा मूल्यवर्धित कर आहे. दंडाची रक्कम, विलंब शुल्क यामुळे उत्पन्न वाढते. ते कराच्या माध्यमातून वाढले पाहिजे. त्यासाठी आवश्यक सुधारणा केल्या पाहिजेत.'

फाटक म्हणाले, 'आयकर, जीएसटी, प्रत्यक्ष करात मोठी वाढ झाली असल्याने स्थैर्य देण्यासाठी त्यामध्ये बदल करण्यात आलेले आहेत. भांडवली खर्चात वाढ केल्याने पायाभूत सुविधांचा विकास होईल. त्यामुळे रोजगारांची निर्मिती होईल, क्षमता वाढतील, उत्पन्न वाढण्यास मदत होईल.'

'रस्ते, रेल्वेमुळे प्रवास गतिमान होणार असल्याने नागरिकांना फायदा होईल. सामान्य नागरिकांना वस्तू स्वस्त मिळावी यासाठी जीएसटीत आवश्यक बदल केले पाहिजेत. त्यासाठी लोकप्रतिनिधी आणि व्यापारी संघटनांनी आवाज उठवला पाहिजे', असे पाठक यांनी सांगितले.

बैंक ऑफ़ बड़ौद
Bank of Barod
स्थावर मालमत्तेच्या